चाणक्य मंडल परिवार




# MPSC

# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)

Headlines: २० ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर २०१९

२५ नोव्हेंबर २०१९

# हेडलाईन्स

## नांदूर मधमेश्वर आणि लोणार सरोवराला 'रामसर' चा दर्जा मिळणार

- नाशिक जिल्ह्यातील नांदूर मधमेश्वर व बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराला लवकरच 'रामसर'चा दर्जा मिळणार असल्याचे संकेत बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीने (BNHS) आयोजित केलेल्या पाणथळ आणि स्थलांतरित पक्ष्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मिळाले.
- नवेगाव बांध, माहुल (शिवडी खाडी), हतनूद धरण, ठाणे खाडी, नांदूर मधमेश्वर लोणार सरोवर, जायकवाडी धरण परिसराला 'रामसर'चा दर्जा मिळावा यासाठी सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्यातील नांदूर मधमेश्वर आणि लोणारला लवकरच संमती मिळेल, असे सूतोवाच मॅंग्रोव्ह फाउंडेशनचे अप्पर प्रधान वनसंरक्षक एन्. वासुदेवन् यांनी केले.
- भारतातील 26 पानथळ जागांचा समावेश रामसरच्या यादीत आहे. यामध्ये महाराष्ट्रातील एकही जागा नव्हती. या नवीन दोन जागांमुळे महाराष्ट्रातील जागांचा समावेश होईल.
- नांदूर मधमेश्वर वन्यजीव अभयारण्यात देशी-विदेशी स्थलांतरित पक्ष्यांच्या 265 प्रजातींची नोंद आहे.
- रामसरमध्ये आढळणाऱ्या 148 स्थलांतरित पक्ष्यांपैकी 88 प्रजाती नांदूर मधमेश्वरमध्ये आढळतात.
- नांदूर मधमेश्वर हे सर्वांत छोटे पक्षी अभयारण्य आहे. येथे एकूण 5,687 पक्षी आढळले आहेत. विविध प्रजातींच्या पक्ष्यांचे अस्तित्व येथे आहे.
- लोणार परिसरातील पाण्याचा सामू (pH) 10.5 असून यातील स्पुरुलिना शैवालामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रोटीन्स आहेत.

**रामसर पाणथळ प्रदेश :**

- पाणथळ प्रदेश ही अशी जमीन आहे, ज्यात पाण्याची पातळी बऱ्याचदा भूजलाच्या पृष्ठभागावर किंवा भूगर्भातील पृष्ठभागाजवळ असते किंवा जेथे जमीन उथळ पाण्याने व्यापलेली असते.
- पाणथळ भूमीवरील संमेलनाबाबत रामसर इराण येथे 1991 मध्ये आंतर-सरकारी करार केला गेला, जो आंतरराष्ट्रीय सहकार्याची चौकट उपलब्ध करून देतो. यात 170 करार आहेत.
- एकूण 248 मिलियन हेक्टर्समध्ये पसरलेल्या 2325 पाणथळ जागांचा रामसरच्या यादीमध्ये समावेश आहे.
- हा करार पक्ष्यांचा अधिवास म्हणून पाणथळ परिसंस्थांचे संवर्धन आणि धोरणी वापर ही दोन मुख्य उद्दिष्टे अधोरेखित करतो. जागतिक महत्त्व असणाऱ्या दलदलीत प्रवेशांची रामसर यादी या कराराचा मुख्य भाग आहे.
- 2 फेब्रुवारी रोजी हा करार स्वीकारल्यामुळे तो दिवस 'जागतिक पाणथळी दिवस' म्हणून साजरा केला जातो.

**भारत व रामसर :**

- भारतातील एकूण 26 प्रदेशांचा या यादीत समावेश असून वेंबनाड कोल (केरळ) हे सर्वात मोठे, तर रेणुका (हिमाचल प्रदेश) सर्वात लहान आकाराचे क्षेत्र आहे.
- 2017 चा पाणथळी दिवस मध्यप्रदेश भोज या ठिकाणी साजरा केला.
- भारत सरकार देशात पाणथळ प्रदेश संवर्धन कार्यक्रम राबवते, त्यात देशातील 115 प्रदेशांची नोंदणी केली आहे.
- **जागतिक पाणथळी दिवसाची थीम**

  **2017 :**
  Weltands for Disaster Risk Reduction.
  **2018 :**
  Weltands for Sustainable Urban Future.
  **2019 :**
  Weltands and Climate Change.

## वरुणास्त्र – नौसेनेसाठी हेवीवेट टॉरपीडो

- भारतीय नौसेना आणि भारत डायनॉमिक्स लिमिटेड (BDL) यांनी नुकताच भारतीय नौदलाला हेवीवेट टॉरपीडो वरुणास्त्र पुरवठा करण्यासाठी 1100 कोटी रुपये मूल्याचा करार केला.

**वरुणास्त्र :**

- वरुणास्त्र एक प्रक्षेपित, विद्युतीयरीत्या चालणारे

अंडरवॉटर शस्त्र आहे जे सर्वात आधुनिक स्वयंचलित आणि रिमोटनियंत्रित प्रणालींपैकी एक आहे.

- लक्ष्य शोधण्यात शस्त्र प्रणाली स्वतःची बुद्धिमत्ता वापरते. ते पाण्याखाली लपलेली पाणबुडी मारू शकते.
- लांबी– सात ते आठ मीटर.
- वजन –1,500 किलो.
- हे शस्त्र नेव्हल सायन्स अँड टेक्नॉलॉजी लॅबोरेटरी (NTSL), विशाखापट्टणम् आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेड (BDL), हैदराबाद यांनी संयुक्तपणे विकसित केले आहे.

**BDL द्वारे तयार केलेली सैन्य उत्पादने :**

1) NAG : विस्फोटक प्रतिक्रियाशील आर्मर. स्थिर लक्ष्यासह वाहनांचा नाश करण्यासाठी टॉप अ‍ॅटॅक क्षमता असलेली तिसरी पिढी.

2) आकाश : ही स्वदेशी विकसित, वायु रक्षा शस्त्र प्रणाली आहे, जी एकाच वेळी अनेक धोक्यांना व्यस्त ठेवू शकते.

3) MRSAM (मध्यम श्रेणी सरफेस टू एअर मिसाइल) : उच्च प्रतिसाद, द्रुत प्रतिक्रिया, सुपरसॉनिक क्षेपणास्त्र.

4) वरुणास्त्र : जहाजाने विद्युतीयरीत्या चालवलेले शस्त्र. सर्वात प्रगत स्वयंचलित आणि दूरस्थ नियंत्रित मार्गदर्शन प्रणालीसह सुसज्ज. लक्ष्य शोधण्यात स्वतःची बुद्धिमत्ता वापरते.

5) मिलान 2T : विस्फोटक प्रतिक्रियाशील आर्मर. स्थिर लक्ष्यासह सज्ज, टँक नष्ट करण्यासाठी

**भारत डायनॅमिक्स लिमिटेड बद्दल :**

- भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाखालील एंटरप्राइज.
- 1970 मध्ये हैदराबादमध्ये मिसाईल आणि संबंधित संरक्षण उपकरणांचे उत्पादन केंद्र म्हणून स्थापन करण्यात आले.
- BDLचे कंचनबाग, हैदराबाद, तेलंगणा येथे तीन उत्पादन केंद्रे आहेत.

## राज्यसभेचे 250 वे अधिवेशन सुरू

- 1952 मध्ये स्थापन झालेल्या राज्यसभेचे 18 नोव्हेंबर पासून सुरू झालेले हे 250 वे अधिवेशन असणार आहे.

**राज्यसभा :**

- संसदेचे वरिष्ठ सभागृह
- लोकसभा ही थेट जनतेचे प्रतिनिधित्व करते तर राज्यसभा ही राज्यांचे प्रतिनिधित्व करते.
- कार्यकाळ 6 वर्षे.
- स्थायी सभागृह, कारण दर दोन वर्षांनी एक तृतीयांश सभासद निवृत्त होतात व पुन्हा नव्याने तेवढेच सभासद निवडले जातात.
- भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.
- राज्यसभेची पहिली सत्र बैठक 13 मे 1952 रोजी झाली.
- एकूण सदस्य :

राज्यसभेची सदस्य संख्या सध्या 245 आहे. पण ही संख्या 250 पर्यंत जाऊ शकते.

- यातील 238 सभासद हे राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या विधिमंडळामार्फत निवडले जातात तर उर्वरित 12 सदस्य राष्ट्रपती कला, साहित्य, विज्ञान व समाजसेवा या क्षेत्रांतून नामनिर्देशित करतात.
- महाराष्ट्राचे राज्यसभेत एकूण 19 खासदार निवडून येतात.

**अन्य राज्यांचे राज्यसभेतील प्रतिनिधित्व –**

| | | |
|---|---|---|
| • उत्तरप्रदेश | : | 31 (सर्वाधिक) |
| महाराष्ट्र | : | 19 |
| तमिळनाडू | : | 18 |
| बिहार | : | 16 |
| पश्चिम बंगाल | : | 16 |
| आंध्र प्रदेश | : | 11 |

- राज्यातून राज्यसभेवर निवडून जाण्याकरिता पहिल्या पसंतीच्या सरासरी 42 मतांची आवश्यकता असते.

**महाराष्ट्रातून सर्वाधिक काळ राज्यसभेत प्रतिनिधित्व**

- काँग्रेसच्या सरोजताई खापर्डे यांनी सर्वाधिक पाच वेळा राज्यातून राज्यसभेत प्रतिनिधित्व केले. प्रमोद महाजन, आबासाहेब कुलकर्णी आणि सुरेश कलमाडी यांनी प्रत्येकी चार वेळा राज्यातून राज्यसभेत सदस्यत्व भूषविले.
- राज्यसभेचे सर्वाधिक काळ म्हणजे सहा वेळा सदस्यत्व नजमा हेपतुल्ला आणि राम जेठमलानी यांनी भूषविले.

## ‘IMD वर्ल्ड टॅलेंट रँकिंग रिपोर्ट 2019’

- स्वित्झर्लंडच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर मॅनेजमेंट

डेव्हलपमेंट (IMD) या संस्थेकडून 'IMD वर्ल्ड टॅलेंट रँकिंग 2019' या शीर्षकाखाली अहवाल प्रसिद्ध केला.

- हा अहवाल देशात प्रतिभावंत व्यक्तित्त्व तयार करण्यासाठीच्या हेतूने गुंतवणूक, विकास, मागणी आणि तत्परता या तीन मुख्य श्रेणीमध्ये देशांनी केलेल्या कामगिरीवर आधारित आहे.

**महत्त्वाच्या बाबी**

- टॅलेंट रँकिंगमध्ये स्वित्झर्लंड अग्रस्थानी आहे.
- यादीतले प्रथम 3 देश - स्वित्झर्लंड, डेन्मार्क, स्वीडन.
- भारत 53 व्या स्थानावरून 59व्या स्थानावर घसरला आहे. मुख्यतः मागणी घटकासंबंधीच्या परिणामामुळे भारताची घसरण झाली.
- प्रदूषणाच्या उपाययोजने बाबतीत भारताचा क्रमांक 61वा आहे.
- जीवनमानाची गुणवत्ता या बाबतीत 51व्या स्थानी आहे.
- प्रति विद्यार्थी शिक्षणावर होणारा एकूण सार्वजनिक खर्च आणि शिक्षणाची गुणवत्ता राखण्याबाबत केलेल्या उपाययोजना या बाबतीत भारताचा 62वा क्रमांक आहे.
- एकूण 39.12 गुणांसह भारत 59व्या स्थानी आहे. त्याच्याखाली मेक्सिको, ब्राझील, व्हेनेझुएला आणि शेवटी मंगोलिया या देशांचा क्रम लागतो आहे.

## जनगणना 2021

- सन 2021 मध्ये देशात जनगणना केली जाणार आहे. 2021ची जनगणना ही 16वी जनगणना असून ती स्वातंत्र्यानंतरची 8वी जनगणना आहे.
- जनगणनेच्या इतिहासात पहिल्यांदाच मोबाईल ॲपमधून ऑनलाइन पद्धतीने नागरिकांची माहिती गोळा केली जाईल व त्याद्वारे राष्ट्रीय जननोंदणी अस्तित्वात येणार आहे. या ॲपमुळे व्यक्तीची माहिती तत्काळ अद्ययावत केली जाऊ शकते.

**ठळक वैशिष्ट्ये**

- ही प्रक्रिया दोन टप्प्यांमध्ये पार पाडली जाणार आहे.
  - (i) प्रथम टप्पा- घरांची गणना (एप्रिल ते सप्टेंबर 2020)
  - (ii) दुसरा टप्पा - देशातल्या रहिवाशांची गणना (9 ते 28 फेब्रुवारी 2021)
- 16 भाषांमध्ये जनगणनेचे काम केले जाणार आहे.
- सुमारे 33 लक्ष 'गणक' घराघरांमध्ये जाऊन लोकांची नोंदणी करणार.
- व्ययविषयक वित्त समितीने यासाठी 8754 कोटी रुपये खर्चाची शिफारस केली आहे.
- जनगणनेसाठी संदर्भ तारीख : 1 मार्च 2021.
- परंतू, जम्मू व काश्मीर, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश यासारख्या प्रदेशांसाठी ही 1 ऑक्टोबर 2020 असेल.

**जनगणनेविषयी**

- पहिली जनगणना 1872 साली लॉर्ड मेयो यांनी केली.
- सन 1881 पासून नियमितपणे जनगणना केली जात आहे.
- 'भोर समिती'च्या सूचनेनुसार जनगणनेची संपूर्ण जबाबदारी केंद्राने घेतली आहे, त्यासाठी 'जनगणना कायदा-1948' तयार करण्यात आला.
- भारताची जनगणना 'जनगणना कायदा-1948' आणि 'जनगणना नियम-1990' (संशोधित कायदा-1993) अंतर्गत नियोजित वेळेत योजनाबद्ध रीतीने पूर्ण केली जाते.
- गृहमंत्रालयाच्या अंतर्गत जनगणनेचे कामकाज पार पडले जाते. 'रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया' (RGI) कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली जनगणनेचे काम चालते.

**काही आकडेवारी**

- भारताचा भौगोलिक विस्तार जगाच्या भौगोलिक आकाराच्या 2.4 टक्के आहे आणि देशाची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या 17.5 टक्के इतकी आहे. (2011 जनगणनेनुसार)

**भारताची जनगणना 2011**

- एकूण लोकसंख्या : 121 कोटी. (51.5% पुरुष, 48.5% स्त्रिया)
- ग्रामीण लोकसंख्या : 68.8%
- शहरी लोकसंख्या : 31.2%
- दशवार्षिक वृद्धीदर : 17.72%
- दशवार्षिक वाढ : 18.22 कोटी
- घनता : 382
- लिंग गुणोत्तर : 943
- लिंग गुणोत्तर (0-6 वर्ष) : 918
- साक्षरता : 72.98%
- घरांची संख्या : 33.08 कोटी
- कुटुंबे 24.67 कोटी

## अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन

- अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाध्यक्षपदी डॉ. जब्बार पटेल यांची निवड झाली.
- होणारे संमेलन हे 100 वे संमेलन असणार आहे.
- अखिल भारतीय साहित्य महामंडळातर्फे या संमेलनाचे आयोजन केले जाते.
- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषेदेचे अध्यक्ष : प्रसाद कांबळी
- पहिले संमेलन : 1905 पुणे, अध्यक्ष : गणेश श्रीकृष्ण खापर्डे

**अलीकडील काही संमेलने**

**97 वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन**

- उस्मानाबाद : 21 ते 23 एप्रिल 2017
- संमेलनाचे अध्यक्ष : जयंत सावरकर
- स्वागताध्यक्ष : आमदार सुजीतसिंह ठाकुर
- उद्घाटक : विनोद तावडे

**98 वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन**

- मुंबई : 13 ते 15 जून 2018
- संमेलनाच्या अध्यक्षा : ज्येष्ठ रंगकर्मी कीर्ती शिलेदार
- उद्घाटक : ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर
- या नाट्यसंमेलनात देण्यात आलेले जीवनगौरव पुरस्कार विद्या पटवर्धन आणि रमेश भाटकर

**99 वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन**

- नागपूर : 22 ते 25 फेब्रुवारी 2019
- संमेलनाचे अध्यक्ष : ज्येष्ठ नाटककार व लेखक प्रेमानंद गज़्वी

## प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतून सात कोटी शेतकऱ्यांना लाभ

- केंद्रीय कृषी कल्याणमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी ही आकडेवारी जाहीर केली.
- 1 कोटी 67 लाख एवढे सर्वात जास्त लाभार्थी उत्तरप्रदेश राज्यातून आले आहेत.

**प्रधानमंत्री किसान सन्मान योजना (PM-KISAN)**

- केंद्र सरकारची छोट्या व सीमांत शेतकऱ्यांसाठीची योजना
- या योजनेद्वारे प्रत्येक शेतकऱ्याला 6000 रुपये प्रति वर्षे इतकी मदत मिळणार.
- ही मदत शेतकऱ्यांना तीन टप्प्यांत मिळणार आहे. प्रत्येक टप्प्यात 2000 रुपये अशा प्रकारे ही रक्कम मिळेल.
- या योजनेचे लाभार्थी 2 हेक्टर्सपेक्षा कमी जमीन असणारे शेतकरी असणार आहेत.
- या योजनेचा लाभ जवळजवळ 12 कोटी शेतकऱ्यांना होणार आहे.

## प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून या वर्षी सर्वात जास्त रस्तेबांधणीचे काम जम्मू आणि काश्मिर राज्यात

- 2019 मध्ये या योजनेतून जम्मू काश्मिरमध्ये 11,400 किमीचे रस्ते तयार करण्यात आले.

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना**

- 25 डिसेंबर 2000 ला या योजनेचा शुभारंभ झाला.
- या योजनेचा उद्देश मैदानी प्रदेशात 500 पेक्षा जास्त व पर्वतीय प्रदेशात 250 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या भागात रस्त्यांनी जोडणे हा आहे.
- ही योजना केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडून राबवली जाते.
- या योजनेसाठी डिझेलवर प्रति एक लिटर 75 पैसे जास्त चार्ज लावला आहे.

## चर्चेतील व्हीप (प्रतोद) म्हणजे काय?

- सभागृहाचा नेता व विरोधीपक्ष नेता यांचा राज्यघटनेत उल्लेख नसला तरी त्यांचा उल्लेख सभागृहाचे नियम व संसदीय कायदा यामध्ये आहेत परंतु व्हीपचा उल्लेख कुठेही नाही.
- हे पद संसदीय सरकारच्या संकेतावर आधारलेले आहे.
- प्रत्येक राजकीय पक्षाचे (सत्तारूढ किंवा विरोधी) स्वत:चे व्हीप (प्रतोद) असतात.
- गृहातील नेत्याला सहाय्य करण्यासाठी राजकीय पक्ष त्यांची नियुक्ती करतात.
- पक्ष सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित राहणे आणि एखाद्या विषयाच्या बाजूने किंवा विरुद्ध समर्थक मिळविण्यासाठी जबाबदारी व्हीपवर असते.
- तो सदस्यांच्या संसदेमधील वर्तणुकीवर लक्ष ठेवतो व त्याचे नियमन करतो.
- त्याने दिलेले सल्ले सदस्यांनी पाळणे अपेक्षित असते अन्यथा शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते.

## पर्यावरणवादी डेव्हिड ॲटनबरो यांना यंदाचा इंदिरा गांधी पुरस्कार

- डेव्हिड ॲटनबरो ह्यांना 2019 चा 'शांती, नि:शस्त्रीकरण आणि विकास' यासाठीचा इंदिरा गांधी पुरस्कार देण्यात आला.
- हा पुरस्कार इंदिरा गांधी मेमोरिअल ट्रस्टच्या वतीने दिला जातो.
- या पुरस्काराची सुरुवात 1986 पासून झाली पुरस्कार 19 नोव्हेंबरला दिला जातो.

### डेव्हिड यांच्याविषयी

- निसर्गाचा समतोल राखण्यासाठी, संरक्षण करण्यासाठी झटणाऱ्या जगातल्या निवडक व्यक्तींपैकी हे एक आहेत.
- ब्रिटिश विद्यापीठाकडून त्यांना तीस हून अधिक मानद पदव्या मिळाल्या.
- केंब्रिज आणि ऑक्सफर्ड विद्यापीठांकडून डॉक्टर ऑफ सायन्स या मानाच्या पदवीने त्यांना सन्मानित केले आहे.

## देशाला मिळाला सर्वांत तरुण न्यायाधीश

- 21 वर्षीय मयंक प्रताप सिंग हा तरुण 'विधी सेवा परीक्षा 2018' उत्तीर्ण झाला आहे. त्यामुळे तो आता देशातील सर्वांत तरुण न्यायाधीश म्हणून कोर्टाचे कामकाज पाहणार आहे.
- मयंकने 2014 मध्ये राजस्थान विद्यापीठातून 5 वर्षांच्या LLB कोर्ससाठी प्रवेश घेतला होता. त्याचा हा कोर्स याच वर्षी पूर्ण झाला आहे.
- सन 2018 पर्यंत विधी सेवा परीक्षांसाठी अर्ज करण्याची वयाची किमान वयोमर्यादा 23 वर्षे होती. मात्र 2019 मध्ये राजस्थान हायकोर्टाने ही मर्यादा 21 वर्षे केली.

## विराटचा नवा विक्रम

- भारतीय संघाचा कर्णधार विराट कोहलीसाठी कोलकात्याच्या ईडन गार्डन मैदानावरचा कसोटी सामना हा संस्मरणीय ठरणार आहे.
- हा कसोटी सामना भारतांमधील पहिला दिवस-रात्र आंतरराष्ट्रीय कसोटी सामना आहे, हा सामना गुलाबी लेदर बॉलने खेळवला जात आहे.
- कर्णधार विराट कोहलीने भारतीय फलंदाजीच्या पहिल्या डावात, पहिल्या दिवशी 32वी धाव काढत अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे.
- कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधार या नात्याने 5,000 धावा काढणारा विराट पहिला भारतीय कर्णधार ठरला आहे.
- तसेच त्याने 86 डावांत ही कामगिरी करत माजी ऑस्ट्रेलियन कर्णधार रिकी पाँटिंगचा विक्रम मोडला आहे. रिकीने 97 डावांमध्ये या आधी अशी कामगिरी करून दाखविली होती.

## दिनविशेष :
## 20 नोव्हेंबर : जागतिक बालदिन

- दरवर्षी 20 नोव्हेंबर या दिवशी जगभरात 'जागतिक बालदिन / जागतिक बालहक्क दिन' (World Childrens' Day) साजरा केला जातो.
- यावर्षी 1989 साली संयुक्त राष्ट्रसंघाकडून बालहक्क करारनामा (Convention on the Rights of the Child) स्वीकारण्यात आल्याच्या घटनेला 30 वर्षे पूर्ण झाली.
- लहान मुलांवरील अत्याचार, त्यांच्यावरील मानसिक तणाव, बालकामगार इत्यादीबाबत समाजात जागरूकता निर्माण होण्यासाठी तसेच त्यांच्या अधिकारांची जाणीव पालकांमध्ये निर्माण व्हावी या हेतूने हा दिवस साजरा केला जातो.

### जागतिक बालदिनाची पार्श्वभूमी

- 20 नोव्हेंबर ही तारीख निवडण्यामागचे कारण म्हणजे, 1959 साली ह्याच दिवशी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने बालहक्क घोषणापत्र (Declaration of the Rights of the Child) स्वीकारले होते. शिवाय 1989 साली ह्याच दिवशी बालहक्कांच्या मसुद्यावर स्वाक्षऱ्याने झाल्या.
- सर्वात पहिला बालदिन ऑक्टोबर 1953 मध्ये जिनिव्हाच्या 'इंटरनॅशनल युनियन फॉर चाइल्ड वेल्फेअर' या संघटनेच्या पुढाकाराने जगभर साजरा करण्यात आला.
- त्यानंतर व्ही. के. कृष्णमेनन ह्यांनी आंतरराष्ट्रीय बालदिनाच्या संकल्पनेला प्रोत्साहन देत ती सभेपुढे मांडली, जी 1954 साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने स्वीकारली.

| | |
|---|---|
| • त्यानुसार, 1954 साली 20 नोव्हेंबरला प्रथम जागतिक बालदिन साजरा झाला.<br>• बालहक्कांमध्ये जगण्याचा अधिकार, ओळख, आहार, पोषण आणि आरोग्य, विकास, शिक्षण आणि मनोरंजन, नाव आणि राष्ट्रीयत्व, कुटुंब आणि कौटुंबिक वातावरण, दुर्लक्ष होण्यापासून सुरक्षा, शोषण, दुर्व्यवहार तसेच बालकांच्या बेकायदेशीर व्यापारापासून बचाव आदी बाबींचा समावेश होतो. | • भारतात 14 नोव्हेंबर रोजी म्हणजेच भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बाल दिन साजरा होतो.<br>• भारतात बालकांची देखरेख आणि सुरक्षा यासाठी मार्च 2007 मध्ये राष्ट्रीय बाल अधिकार सुरक्षेसाठी एक आयोग आणि संवैधानिक संस्थेची निर्मिती करण्यात आली. |

चाणक्य मंडल परिवार

# राष्ट्रपती राजवट

- संविधानातील भाग 18 हा आणीबाणी संदर्भातील कलमांशी निगडित आहे.
- यामध्ये राष्ट्रीय आणीबाणी (कलम 352), राष्ट्रपती राजवट (कलम 356) आणि आर्थिक आणीबाणी (कलम 360) यांचा समावेश होतो.
- कलम 355 – प्रत्येक राज्यातील सरकार हे संविधानानुसार चालते आहे की नाही, याची खातरजमा करणे हे केंद्र सरकारचे कर्तव्य आहे.
- कलम 356 – जर राज्य सरकारचे काम संविधानानुसार चालत नसेल, तर राष्ट्रपती अध्यादेशाद्वारे राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करू शकतात.
- राष्ट्रपती राजवटीच्या निर्णयाला, निर्णय लागू झाल्यानंतर दोन महिन्यांत संसदेची मंजुरी घेणे आवश्यक असते. ही मंजुरी सभागृहाच्या साध्या बहुमताने घेतली जाते.
- मंजुरी मिळाल्यानंतर राष्ट्रपती राजवट सहा महिन्यांसाठी लागू राहते व ती पुढे कमाल ३ वर्षांपर्यंत वाढवता येते.
- प्रत्येकी सहा महिन्यांनंतर संसदेची मंजुरी लागते.
- 44 व्या घटनादुरुस्तीने, एक वर्षानंतर राष्ट्रपती राजवट पुढे चालू ठेवायची असल्यास –
  1. भारतामध्ये किंवा भारतातील कोणत्याही भागात राष्ट्रीय आणीबाणी लागू असावी.
  2. निवडणूक आयोगाने, संबंधित राज्यात पुनर्निवडणुका घेणे शक्य नाही, असे प्रमाणित केली असावे.

  या दोन्ही अटी संविधानात टाकण्यात आल्या.
- राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतर राज्यातील सर्व कार्यकारी अधिकार राष्ट्रपती स्वतःकडे घेतात.
- राज्याचे मंत्रीमंडळ बरखास्त होते.
- राज्याचे राज्यपाल, राष्ट्रपतींच्या वतीने, राज्यकारभार चालवतात.
- या काळात राष्ट्रपतींनी किंवा संसदेने संबंधित राज्यासाठी केलेले कायदे राजवट मागे घेतल्यानंतरही लागू राहतात.
- राष्ट्रपती स्वतः आदेशाद्वारे राष्ट्रपती राजवट मागे घेऊ शकतात.

**भारतात आतापर्यंत राष्ट्रपती राजवटीचा वापर :**

- इ.स. 1950 पासून आतापर्यंत भारतात 100 पेक्षा जास्त वेळा राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे.
- सर्वात पहिल्यांदा 1951मध्ये पंजाब राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.
- आतापर्यंत सर्वात जास्त वेळा मणिपूर राज्यात (10 वेळा), त्यानंतर उत्तरप्रदेश राज्यात (9 वेळा) राष्ट्रपती राजवट लावण्यात आली आहे.
- 1977 च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर, जनता पक्षाच्या सरकारने भारतातील नऊ राज्यांमध्ये, जेथे काँग्रेस पक्ष सत्तेत होता, राष्ट्रपती राजवट लागू केली.
- 1980 मध्ये जेव्हा काँग्रेस पक्ष पुन्हा सत्तेत आला, तेव्हा या पक्षाने परत नऊ राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली.
- 1992 मध्ये काँग्रेस पक्षाने मध्यप्रदेश हिमाचल प्रदेश, राजस्थान या राज्यांमध्ये, केंद्राने लावलेल्या धार्मिक संघटनांवरील बंदीला प्रामाणिकपणे अंमलबजावणी न केल्यामुळे राष्ट्रपती राजवट लागू केली.
- अशा प्रकारे कित्येक वेळा केंद्रात सत्तेत असलेल्या पक्षाने राजकारणासाठी राष्ट्रपती राजवटीचा दुरुपयोग केलेला आढळतो.

**सुप्रीम कोर्टाचा निर्णय :**

- 1994 च्या एस. आर. बोम्मई खटल्यात कलम 356 च्या वापरावर पुढील बंधने घातली आहेत.
  1. 356 च्या वापराचे न्यायालयीन पुनर्विलोकन करू शकते.
  2. राष्ट्रपती राजवट लागू करण्यामागची कारणे ही आहेत की नाहीत हे सिद्ध करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची असेल.
  3. जर न्यायालयाला राष्ट्रपती राजवट असंविधानिक असल्याचे सिद्ध झाले, तर

न्यायालय संबंधित राज्य सरकार पुन:स्थापित करू शकते.

4. घटक राज्य सरकार अल्पमतात आले आहे, हे विधानसभेच्या पटलावर सिद्ध झाल्याशिवाय राज्यपालांनी सरकार बरखास्तीचा निर्णय घेऊ नये.
5. धर्मनिरपेक्षतेच्या आधारावर राज्य सरकार बरखास्त करता येऊ शकते.

- या मुद्द्याला अनुसरून, सुप्रीम कोर्टाने 1992 मध्ये लावण्यात आलेली राष्ट्रपती राजवट वैध ठरवली. परंतु 1988 मधील नागालँड राज्य, 1989 मधील कर्नाटक आणि 1991 मधील मेघालय राज्यातील राष्ट्रपती राजवट असांविधानिक ठरविली.
- जर निवडणुकीत सर्वात जास्त जागा मिळालेला पक्ष सरकार स्थापन करण्यात असमर्थ असेल आणि राज्यपाल दुसरे कोणतेही पर्यायी सरकार स्थापन करण्यात असमर्थ असतील, तर अशा परिस्थितीत राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते.
- परंतु एखाद्या सरकारने राजीनामा दिल्यानंतर, दुसऱ्या पर्यायी सरकारचा शोध न घेता राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ नये.
- पक्षीय राजकारणासाठी कलम 356चा वापर केला जाऊ नये.

**राष्ट्रपती राजवट आणि महाराष्ट्र :**

- महाराष्ट्रात आतापर्यंत 3 वेळा राष्ट्रपती राजवट लावण्यात आली आहे.
- पहिल्यांदा 1980 मध्ये लावण्यात आली. त्यावेळी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार बरखास्त करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्रात 17 फेब्रुवारी 1980 ते 9 जून 1980 पर्यंत राष्ट्रपती शासन होते.
- दुसऱ्यांदा 2014 मध्ये लावण्यात आली. 2014 मध्ये 32 दिवसांसाठी, अर्थात 28 सप्टेंबर 2014 ते 31 ऑक्टोबर 2014 या काळात राष्ट्रपती राजवट होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने पृथ्वीराज चौहान सरकारचा पाठिंबा काढून घेतला. तेव्हा पृथ्वीराज चौहान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत राजीनामा दिला.
- तिसऱ्यांदा म्हणजेच 2019 मध्ये निवडणुकीनंतर कोणत्याही पक्षाकडे बहुमत नसल्यामुळे राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे.
- आतापर्यंत फक्त छत्तीसगढ आणि तेलंगणा राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली गेलेली नाही.
- भारतात एकूण 126 वेळा राष्ट्रपती राजवट विविध राज्यांमध्ये लावण्यात आली आहे.